लोकमत

# बाबासाहेबांच्या संघर्षामुळेच जनतेला न्याय : कैलास कणसे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व मानवसमाजाचा विचार करुन न्यायाची भूमिका आग्रहाने मांडली. त्यामुळेच सामाजिकदृष्ट्या मागास समाजांना न्याय मिळत आला आहे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेचे (बार्टी) महासंचालक कैलास कणसे यांनी केले. बार्टीतील सहायक प्राध्यापक डॉ. राजू अडागळे यांनी होलार समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीबाबत केलेल्या संशोधन अहवालावर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. विभागीय जात पडताळणी कार्यालयाच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला. कणसे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन चर्चासत्राची सुरुवात झाली.

- कणसे म्हणाले, "महाराष्ट्रातील होलार समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीबाबतचे संशोधन करण्यात आले आहे. या संशोधनातून समोर आलेल्या बाबींचा सकारात्मक विचार करुन होलार समाजाच्या उन्नतीसाठी ज्या उपाययोजना कराव्या लागतील, त्याबाबत शासनासोबत समन्वय ठेवून करण्याचा आमचा प्रयत्न राहील. तसेच हा संशोधन अहवाल लवकरच शासनाला सादर करण्यात येईल."

या वेळी निबंधक सविता नलावडे, धीरज खाडे, अमर सोनवणे यांच्यासह होलार समाजातील विविध संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.